जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५५४ दिनांक - १६/०७/२०२३**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## टोळी प्रमुख सिद्धार्थ विजय गायकवाड व त्याचे इतर १६ साथीदार यांचेविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक दि.२६/०६/२०२३ रोजी फिर्यादी हे लहुजी शक्ती सेना येथील ऑफिसजवळ थांबले असता,तेथे सिध्दार्थ गायकवाड, राजु उमाप व त्याचा मुलगा राम उमाप, विधीसंघर्षीत बालक व त्यांचे इतर साथिदार फिर्यादी यांचे जवळ हातात लोखंडी धारधार हत्यारे घेवुन हवेत फिरवुन,सिध्दार्थ गायकवाड याने दत्ता जाधव यास तुम्हा दोघांना व तुमच्या गँगला आम्ही बघुन घेतो,तुम्ही सुधरा नाहीतर मर्डर करीन अशी धमकी दिली. सिध्दार्थ गायकवाड याने फिर्यादीस लोखंडी हत्याराचा धाक दाखवुन त्यांचे खिश्यातुन बळजबरीने १,०००/- रूपये काढुन घेवुन,तुला बघुन घेतो अशी धमकी दिली. त्यानंतर राजु उमाप,सिध्दार्थ गायकवाड,लखन खंडागळे,दोन विधीसंघर्षीत बालक,राम उमाप,समिर शेख,हर्ष ढेरे,डई,गौरव नाईक,नटया, चेतन,लाडया, गणेश,नब्बा,सनी परदेशी व ७ ते ८ इतर इसमांनी लोखंडी हत्यार घेवुन परिसरातील वाहनांची तोडफोड करून नुकसान केले. म्हणुन सदरबाबत सहकारनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.१४५/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३९५,३२३,४५२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७,५०४,५०६ आर्म अ‍ॅक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५,मपोकाक.१४२ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट अ‍ॅक्ट कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **१)सिध्दार्थ विजय गायकवाड,वय २२ वर्षे रा.अण्णाभाऊ साठे वसाहत,अरण्येश्वर,पुणे (टोळी प्रमुख) २)राम राजाभाऊ उमाप,वय २३ वर्षे,रा.सदर ३) सनी ऊर्फ किरण कैलास परदेशी,वय २७ वर्षे,रा.सदर ४)अमोल ऊर्फ नाना जालिंदर बनसोडे,वय ३१ वर्षे,रा.सदर ५)समीर रज्जाक शेख,वय २३ वर्षे,रा.सदर ६)राजाभाऊ ऊर्फ जटाळया लक्ष्मण उमाप,वय ५० वर्षे,रा.सदर ७)गणेश ऊर्फ भुषण कैलास परदेशी,वय ३० वर्ष,रा.सदर ८)नब्बा ऊर्फ नरेश सचिन दिवटे,वय-२६ वर्षे,रा.स.नं.१३३,दांडेकर पुल,पुणे ९)हर्षद आप्पा ढेरे,वय-२२ वर्षे,रा. आंबेडकरनगर, मार्केटयार्ड,पुणे १०)शुभम ऊर्फ डुई अनिल ताकतोडे,वय १९ वर्षे,रा.सदर ११)विशाल शिवाजी पाटोळे,वय १९ वर्षे,रा.सदर १२)चेतन महादेव कांबळे,वय २६ वर्षे,रा.सदर १३) गौरव अरविंद नाईकनवरे,वय २२ वर्षे रा.६४/१२ जय हिंद नगर,अपर इंदिरानगर बिबवेवाडी पुणे (आ.क्र.१ ते १३ यांना अटक करण्यात आली आहे.) तसेच इतर ०२ विधीसंघर्षीत बालके यांना ताब्यात घेण्यात आले असुन,इतर ०२ (टोळी सदस्य) पाहिजे आरोपी आहेत.**

गुन्ह्याचे तपासा मध्ये सदर आरोपी सिध्दार्थ विजय गायकवाड,वय-२२ वर्षे,रा.अण्णाभाऊ साठे वसाहत, अरण्येश्वर,पुणे (टोळी प्रमुख) याने त्याचेसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन,स्वतःची संघटीत टोळी तयार करून, अवैद्य मार्गाने अर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी, संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा दपटशहा दाखवुन, सहकारनगर, भारती विदयापीठ, स्वारगेट, दत्तवाडी, कोंढवा, मार्केटयार्ड, बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत दरोडा, जबरी चोरी, प्राण घातक शस्त्र जवळ बाळगणे, सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, बेकायदेशीर जमाव जमवून, लोकांमध्ये हल्ले करून, घातक शस्त्र जवळ बाळगणे, नागरीकांच्या मालमत्तेचे नुकसान करणे, आपल्या टोळी सदस्यांकडुन गुन्हे घडवुन आणणे व दहशत निर्माण करणे, पोलीसांनी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी काढलेल्या आदेशांचा भंग करणे, गुन्हयासाठी बेकायदेशीर घातक शस्त्राचा वापर करुन दहशत निर्माण करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्याने वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा

तसेच जनमानसात दहशत राहावी हाच उद्देश ठेवुन गुन्हे केलेले आहेत. अशा प्रकारचे गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील सुध्दा त्यांनी सहकारनगर,भारती विदयापीठ,स्वारगेट, दत्तवाडी,कोंढवा,मार्केटयार्ड,बिबवेवाडी या भागात सक्रीय असल्याचे अभिलेखाची पडताळणी केल्यानंतर,पुर्वीच्या टोळीत फुट पडुन दोन टोळ्या तयार होवुन,टोळी वर्चस्वावरुन व स्वतःचा आर्थिक फायदा होणेसाठी त्यांनी पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीवर एकुण ०४ गुन्हे एकत्र केल्याची नोंद असुन,स्वंतत्रपणे एकुण १० गुन्हे असे एकुण १४ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आली आहे. टोळीचा मुख्य सुत्रधार सिद्धार्थ विजय गायकवाड याने व त्याचे संघटीत टोळीतील साथीदार यांनी त्यांनी आपल्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व आर्थीक फायदयासाठी यातील आरोपी यांनी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे बेकायदेशिरपणे आर्थिक फायदया करीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयात **महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)** प्रमाणेचा अंर्तभाव करणे कामी सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुरेंद्र गजेंद्र माळाळे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परि-०२, पुणे, श्रीमती. स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. प्रविणकुमार पाटील यांना सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून सहकारनगर पोलीस स्टेशनकडील गुरनं.१४५/२०२३,भारतीय दंड संहिता कलम ३९५,३२३,४५२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७,५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधि.कलम ३७(१)(३)१३५,मपोकाक.१४२ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ प्रमाणे असलेल्या गुन्हयात **महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२), ३(४)**प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री.नारायण शिरगावकर,मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त,परि-०२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे, श्री. नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पो स्टे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुरेंद्र गजेंद्र माळाळे पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संदिप देशमाने,सव्हेलन्स पथकाचे पोलीस अंमलदार संजय गायकवाड, मंगेश खेडकर, पुजा तिडके, भाऊसाहेब आहेर यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ३६ वी कारवाई आहे.**